# जाहिरात

महाराष्ट्र शासन महिला व बाल विकास विभाग,शासन निर्णय क्र.एबावि-२०२२/प्र.क्र.९४/का-६ दि.०२ फेब्रूवारी २०२३ व महाराष्ट्र शासन महिला व बाल विकास विभाग,शासन निर्णय क्र.एबावि-२०२२/प्र.क्र.९४/का-६ दि.३० जानेवारी २०२५ नुसार एकात्मिक बाल विकास सेवा योजना हया केंद्र पुरस्कृत योजनेअंतर्गत अंगणवाडी मदतनीस यांची रिक्त पदे सरळ नियुक्तीने (By Nomination) भरण्यासाठी पात्र महिला उमेदवारांकडून अर्ज मागणी करण्यात येत आहे.अंगणवाडी मदतनीस या मानधनी पदाच्या सरळ नियुक्ती संदर्भात आवश्यक शैक्षणिक पात्रता अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | तपशिल | अटी व शर्ती |
|---|---|---|
| १ | पदाचे नांव | अंगणवाडी मदतनीस (मानधनी सेवा) |
| २ | मानधन | अंगणवाडी मदतनीस एकत्रित मानधन दरमहा रूपये ७५००/- |
| ३ | शैक्षणिक पात्रता | अंगणवाडी मदतनीस पदासाठी किमान शैक्षणिक पात्रता इयत्ता १२ वी उत्तीर्ण (राज्य शिक्षण मंडळ अथवा त्यास समकक्ष) शैक्षणिक अर्हता धारण करणा-या उमेदवाराने शैक्षणिक पात्रतेच्या आवश्यक कागदपत्रांच्या व गुणपत्रिकांच्या सत्यप्रती सोबत जोडाव्यात. |
| ४ | वास्तव्याची अट | ज्या नगरपंचायत / नगरपरिषद क्षेत्रात मदतनीस पद रिक्त आहे. शिरोळ व आजरा या नगरपंचायत / नगरपरिषदक्षेत्रातील रहिवाशी असलेल्या उमेदवारांना पात्र समजण्यात येईल.स्थानिक रहिवाशी असलेबाबत शासनाने निश्चित केलेला पुरावा सोबत जोडणे आवश्यक. (रेशनकार्ड, मतदान ओळखपत्र, आधारकार्ड, तलाठी रहिवाशी प्रमाणपत्र,डोमेसाईल प्रमाणपत्र) तथापि वास्तव्याबाबत तक्रार झाल्यास किंवा संदिग्धता निर्माण झाल्यास तहसीलदार यांचे रहिवाशी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक. नियुक्ती नंतर सदर उमेदवारास त्या नगरपंचायत / नगरपरिषदक्षेत्रात वास्तव्य करणे बंधनकारक राहील. |
| ५ | वयाची अट | जाहिरात प्रसिध्दिच्या दिनांकास म्हणजेच दि.०१/०८/२०२६ रोजी किमान १८ वर्षे व कमाल ३५ वर्षे आणि विधवा उमेदवारासाठी वयोमर्यादा कमाल ४० वर्षे राहिल. |
| ६ | लहान कुटूंब | १.उमेदवारास जास्तीत जास्त २ हयात अपत्ये असावीत.<br>२.उमेदवाराला २ हयात अपत्यापेक्षा (दत्तक दिलेल्या अपत्यांसह) अधिक अपत्य असल्यास उमेदवार नियुक्तीसाठी पात्र ठरणार नाही.सदर बाब नियुक्तीनंतर निदर्शनास आल्यास उमेदवाराला सेवेतून तात्काळ सेवामुक्त करण्यात येईल.तसेच सेवा कालावधीमध्ये त्यास २ हयात अपत्य (दत्तक दिलेल्या अपत्यांसह) असून देखील तिसरे अपत्य झाल्यास त्यांच्या सेवा समाप्त करण्यात येईल. |
| ७ | भाषेचे ज्ञान | ज्या अंगणवाडी केंद्राकरीता अंगणवाडी मदतनीसची नियुक्ती करावयाची आहे अशा अंगणवाडीमध्ये ५०% पेक्षा जास्त मुले मराठी भाषा व्यतिरिक्त इतर भाषा (उर्दु,हिंदी इ.पैकी एक भाषा) बोलणारी असतील तर तेथील अंगणवाडीमध्ये मदतनीस पदावर सदर भाषेचे ज्ञान असलेल्या (लिहीता व |

| | | |
|---|---|---|
| | | वाचता येणे)उमेदवाराची नियुक्ती करण्यात यावी.तसेच उमेदवाराने इयत्ता १० वी किंवा १० वी पेक्षा जास्त शैक्षणिक अर्हतेपैकी किमान एक अर्हता मराठी भाषा विषयासह उत्तीर्ण असणे आवश्यक राहिल. |
| ८ | विधवा / अनाथ उमेदवारांबाबत | १. अनाथ उमेदवार असल्यास सक्षम प्राधिका-याचे प्रमाणपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे. २.उमेदवार विधवा असल्यास पतीचे मृत्यू प्रमाणपत्र व पुनर्विवाह झाले नसलेबाबत उमेदवाराचे स्वंयघोषणापत्र जोडणे आवश्यक राहील. |
| ९ | बदली | अंगणवाडी मदतनीस हे **एकाकी पद** असल्यामुळे तसेच स्थानिक रहिवाशी असावी या केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना विचारात घेता **अंगणवाडी कर्मचा-यांना बदलीचे कोणतेही प्रावधान राहणार नाही.** |
| १० | मागासवर्ग प्रवर्ग | अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती / इतर मागास प्रवर्ग / विमुक्त जाती / भटक्या जमाती / अर्थिक दृष्टया दुर्बल घटक / विशेष मागास प्रवर्ग/ सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासवर्ग या उमेदवाराने सक्षम प्राधिका-याचे प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत सोबत जोडावी. |
| ११ | अनुभव | शासकीय यंत्रणेतील एकात्मिक बाल विकास सेवा योजने अंतर्गत अंगणवाडी सेविका / मदतनिस / मिनी अंगणवाडी सेविका म्हणून कमीत कमी २ वर्षाचा अनुभव असल्यास सोबत सक्षम प्राधिका-याचे प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत सोबत जोडावी. |
| १२ | जाहिरात प्रसिध्दी | ०१/०८/२०२६ |
| १३ | अर्ज स्विकारण्याचा अंतिम दिनांक | अर्ज स्विकारण्याचा अंतिम दिनांक १४/०८/२०२६ वेळ ०६.०० वाजेपर्यंत स्वीकारण्यात येतील.**अर्ज स्वीकारण्याचे ठिकाण - बाल विकास प्रकल्प अधिकारी नागरी प्रकल्प जि.कोल्हापूर सी.एस.नं.५७९,बागवाडे बिल्डींग, पहिला मजला,व्यापारी पेठ , शाहुपुरी, कोल्हापूर ४१६००१** |
| १४ | प्राथमिक यादी | अर्ज स्वीकारण्याच्या शेवटच्या दिनांकापासून कार्यालयीन १५ दिवस (कार्यालयात नोटीस बोर्ड वर प्रसिध्द करण्यात येईल) |
| १५ | यादीस हरकती | कार्यालयात/नोटीस बोर्डवर प्रसिध्द झाल्यापासून पुढील कार्यालयीन १० दिवसात |
| १६ | प्रतिक्षा यादी | जर उमेदवार हा नियुक्ती दिनांकाच्या आदेशापासून ३० दिवसामध्ये रूजू झाला नाही किंवा अपात्र ठरविण्यात आले तर प्रतिक्षा यादीतील गुणानूक्रमांकानुसार नियुक्ती देण्यात येईल व सदर प्रतिक्षा यादी अंतिम निकाल जाहीर झाल्यापासून एक वर्षापर्यंत वैध राहील. |
| १७ | निवड प्रक्रिये विरूध्द तक्रार / अपिल | १.प्राथमिक गुणवत्तायादी बाबत कोणताही आक्षेप असल्यास प्राथमिक यादी प्रसिध्द झाल्यापासून १० दिवसाच्या आत **बाल विकास प्रकल्प अधिकारी नागरी प्रकल्प जि.कोल्हापूर सी.एस.नं.५७९,बागवाडे बिल्डींग, पहिला मजला,व्यापारी पेठ,शाहुपुरी, कोल्हापूर ४१६००१** यांच्याकडे लेखी स्वरूपात पुराव्यासह तक्रार करावी.त्यानंतर प्राप्त झालेल्या तक्रारीची कोणत्याही परिस्थितीत दखल घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.<br>२. अंतिम निवड यादी बाबत कोणताही आक्षेप असल्यास अंतिम यादी घोषित झाल्यापासून ३० दिवसाच्या आत मा.विभागीय उपायुक्त,महिला व |

| | | |
|---|---|---|
| | | बाल विकास,पुणे विभाग,पुणे यांच्याकडे अपिल दाखल करता येईल. त्यानंतर प्राप्त झालेल्या तक्रारीची कोणत्याही परिस्थितीत दखल घेतली जाणार नाही. |
| १८ | कागदपत्रांच्या प्रती | अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांच्या प्रती सक्षम प्राधिका-याने साक्षांकीत केलेल्या असाव्यात.(साक्षांकन राजपत्रित अधिकारी, माध्यमिक शाळांचे मुख्याध्यापक,प्राचार्य यांचे असावे.) |
| १९ | अर्ज | १.जाहिराती मध्ये दिलेल्या विहित नमून्यात अर्ज करावा.(अर्जात खाडाखोड/गिरवागिरव करू नये. तसेच व्हाईटनरचा उपयोग करू नये. असे अर्ज रदद करण्यात येतील.) अर्ज सादर करतेवेळी आवश्यक कागदपत्रे अर्जासोबत जोडावी.अर्ज सादर केलेनंतर कोणतेही कागदपत्रे/प्रमाणपत्र घेतले जाणार नाही.<br>२.अर्जदाराने नियुक्तीकरीता कोणत्याही प्रकारचा प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष दबाव आणल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल.<br>३.अंतिम दिनांका नंतर आलेल्या किंवा डाकेने (पोस्टामुळे)विलंब झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.<br>४.अंतिम निवड झालेल्या उमेदवाराला निकालाबाबत कळविण्यात येईल.इतर उमेदवारांना कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.<br>५.अंगणवाडी मदतनीस यांना शासन दरानुसार दरमहा मानधन देय आहे.शासकीय नियमानुसार एकत्रीत मानधनात वेळोवेळी करण्यात आलेली वाढ नियमानुसार अनुज्ञेय राहील. मात्र मानधना व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचे भत्ते /सवलती अनुज्ञेय राहणार नाहीत<br>६.अंगणवाडी मदतनीस हे एकत्रित मानधनावरील मानधनी स्वरूपाचे पद आहे. सदर पदास बदली,सेवानिवृत्ती वेतन,वेतनवाढ इ.शासकीय सवलतीस पात्र नाही.<br>७.उमेदवाराने विवाहपूर्वीचे नांव व विवाहनंतरचे नांव या दोन्ही नावांची व्यक्ती एकच असलेबाबतचे राजपत्र (गॅझेट), विवाह निबंधकाचे विवाह नोंदणी प्रमाणपत्र किंवा स्वंयघोषणापत्र सादर करणे आवश्यक राहील. |
| २० | निवड प्रक्रिया | शासन निर्णयात नमुद केल्याप्रमाणे उमेदवाराच्या शैक्षणिक गुण पत्रिकेमध्ये मिळालेल्या गुणांच्या आधारे कमाल ८० गुण व अतिरिक्त कमाल २०गुण.(विधवा/अनाथ-१० गुण,अनुसूचित जाती/जमाती-०५गुण,इतर मागास प्रवर्ग/विमुक्त जाती/भटक्या जमाती/अर्थिक दृष्टया दुर्बल/विशेष मागास प्रवर्ग, सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग-०३ गुण,अंगणवाडी सेविका/मदतनीस पदाचा ०२ वर्ष अनुभव असल्यास-०५ गुण) गुणांकनाच्या तपशिलासाठी सोबत जोडलेले परिशिष्ट पहावे. |
| २१ | पत्र व्यवहार | भरती प्रक्रियेसंबंधी अर्जदारास कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.सर्व सुचना जाहिराती मधील अटी व शर्ती प्रमाणे असून वेळोवेळी सुचना कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर लावण्यात येतील. |
| २२ | अंगणवाडी निवड | नगरपंचायत/ नगरपरिषद निहाय अंतिम गुणवत्ता यादी जाहीर झाल्यानंतर गुणानुक्रमानुसार अंगणवाडी मदतनिस यांची निवड केली |

| | | |
|---|---|---|
| | | जाईल. व गुणक्रमानुसार अंगणवाडी केंद्रावर नियुक्ती देतांना प्राधान्यक्रम देण्यात येईल.त्यामुळे नगरपंचायत/ नगरपरिषद कार्यक्षेत्रातील कोणत्याही अंगणवाडी केंद्रावर काम करावे लागेल व त्यांना प्रवास भत्ता अनुज्ञेय राहणार नाही. |
| २३ | सेवा समाप्तीसाठी वयाची अट | सदर जाहिरातीव्दारे नियुक्त होणा-या अंगणवाडी मदतनीस यांची सेवा वयाची ६० वर्ष पुर्ण होईपर्यंत वा त्या शारीरिक दृष्ठया काम करण्यास सक्षम नसल्यास यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत सुरू राहिल. |
| २४ | भरती प्रक्रिया शासन निर्णय | १)महाराष्ट्र शासन महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्र. एबावि-२०२२/प्र.क्र.९४/का-६ दि.०२ फेब्रूवारी २०२३<br>२) महाराष्ट्र शासन महिला व बाल विकास विभाग,शासन निर्णय क्र.एबावि-२०२२/प्र.क्र.९४/का-६ दि.११ ऑगस्ट २०२३<br>३) महाराष्ट्र शासन महिला व बाल विकास विभाग,शासन निर्णय क्र.एबावि-२०२२/प्र.क्र.९४/का-६ दि.२७ फेब्रुवारी २०२४<br>४).महाराष्ट्र शासन महिला व बाल विकास विभाग,शासन निर्णय क्र.एबावि-२०२२/प्र.क्र.९४/का-६ दि.३० जानेवारी २०२५ |

**अर्जदाराचा**
**फोटो**

# <u>अर्जाचा नमुना</u>

**<u>प्रति</u>**

**मा.बाल विकास प्रकल्प अधिकारी**

**नागरी जिल्हा कोल्हापूर**

**विषय - अंगणवाडी मदतनीस पदाकरीता अर्ज**

संदर्भ -दैनिक वृत्तपत्र ---------------------------------------मधील

दि. ३१/०७/२०२६ रोजीची जाहिरात सुचना

महोदय ,

मी खाली सही करणार -------------------------------------------मी नगरपंचायत/नगरपरिषद कार्यक्षेत्रातील रहिवाशी असून,अंगणवाडी मदतनीस पदाकरीता अर्ज करू इच्छित आहे.त्यासाठी मी माझी संपूर्ण माहिती खालील प्रमाणे सादर करीत आहे.

१) विवाहापुर्वीचे नाव ----------------------------------------------------------------------------

२) विवाहानंतरचे नाव ---------------------------------------------------------------------------
(वरील व्यक्ती १ व २ प्रमाणे एकच असल्याचा पुरावा सोबत जोडावा)

३) जन्मतारीख-
(जन्मतारीख पुरावा म्हणून शाळा सोडल्याचा दाखला किंवा १० वी चे प्रमाणपत्र यापैकी कोणत्याही एका प्रमाणपत्राची सत्यप्रत सोबत जोडावी.)

४) जाहिरातीच्या दिनांकास(दि.०१/०८/२०२६ रोजीचे वय) वय वर्ष----- महिने---- -दिवस----

५) जात व संवर्ग-------------------------------------------------------------------------------
(अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती / इतर मागास प्रवर्ग / विमुक्त जाती / भटक्या जमाती / आर्थिक दृष्टया दुर्बल घटक / विशेष मागास प्रवर्ग/सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासवर्ग या उमेदवाराने सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत सोबत जोडावी.)

६) रहिवाशी संपूर्ण पत्ता------------------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------------

७) हयात अपत्यांची संख्या -------------- शेवटच्या मुलाचा जन्म दिनांक-------------

८) शैक्षणिक पात्रता-

| अ.क्र. | शिक्षण | वर्ष | शाळेचे/बोर्डाचे नांव | गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १. | इयत्ता बारावी | | | | |
| २. | पदवीधर | | | | |
| ३. | पदव्यूत्तर | | | | |
| ४. | डी.एड. | | | | |
| ५. | बी.एड. | | | | |
| ६. | शासकीय मान्यता संस्थेचे संगणक परिक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र (MS-CIT) अथवा शासनाने वेळोवेळी शासनाने समकक्ष ठरविलेला अभ्यासक्रम | | | | |

९) उमेदवार स्थानिक रहिवाशी आहे/नाही---------------------------------------------------------

(असल्यास सक्षम प्राधिकारी यांचे प्रमाणपत्र सत्यप्रत सोबत जोडावी)

१०) उमेदवार विधवा/अनाथ मुलीपैकी आहे/नाही------------------------------------------------

(असल्यास सक्षम प्राधिकारी यांचे प्रमाणपत्र सत्यप्रत सोबत जोडावी)

११) उमेदवार विवाहीत/अविवाहीत आहे---------------------------------------------------------

१२) उमेदवारास दोन किंवा दोनपेक्षा कमी अपत्य असल्याचे प्रतिज्ञापत्र जोडले आहे/नाही-------

(याबाबतचे प्रतिज्ञापत्राची प्रत सोबत जोडावी)

१३) शासकीय अंगणवाडीतील सेविका/मदतनीस कमीत कमी २ वर्ष अनुभव आहे काय ? -----

(असल्यास प्रमाणपत्र सोबत जोडावे)

१४) दुरध्वनी क्रमांक/भ्रमणध्वनी क्रमांक------------------------

वरील संपूर्ण माहिती खरी असून ती चुकीची आढळल्यास माझा अर्ज फेटाळला जाईल किंवा माझी निवड झाल्यानंतरही माझी नियुक्ती कोणत्याही क्षणी रदद करण्याचा अधिकार सर्वस्वी नियुक्ती प्राधिका-यांना आहे याची मला पुर्ण जाणीव आहे. तसेच जर माझी अंगणवाडी मदतनीस म्हणून निवड झाल्यास बाल विकास प्रकल्प अधिकारी नागरी जिल्हा कोल्हापूर प्रकल्प अंतर्गत नगरपंचायत /नगरपरिषद निहाय गुणानूक्रम देण्यात येणा-या कोणत्याही अंगणवाडी केंद्रावर मी काम करण्यास तयार आहे.

दि. / /२०२६ (उमेदवाराची सही)

संपूर्ण नांव -----------------------

# परिशिष्ट ब - लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र

मी ------------------------------------------------------------------------------------

श्री.-------------------------------------------------------------यांची पत्नी वय वर्ष----------

राहणार -----------------------------------------------------------------------------------------

याव्दारे पुढीलप्रमाणे असे जाहीर करते की,

१.मी **अंगणवाडी मदतनीस** पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

२.आज रोजी मला खालीलप्रमाणे अपत्ये आहेत.

| अ.क. | मुलाचे/मुलीचे नांव | जन्मतारीख | वय |
|---|---|---|---|
| १ | | | |
| २ | | | |
| | | | |

३.हयात असलेल्या अपत्यांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल किंवा भविष्यात दोनपेक्षा अधिक अपत्ये झाल्यास अंगणवाडी मदतनीस या मानधनी पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास किंवा सेवेतून कमी करण्यास पात्र होईल याची मला जाणीव आहे.

ठिकाण-

दिनांक- (नांव व सही)

| |
|---|
| **अर्जदाराचा फोटो** |

# **स्वंयघोषणापत्र**

मी ---------------------------------------------------------------श्री.------------------------- ----------------- यांची पत्नी / मुलगी वय ----- वर्ष, आधारक्रमांक------------------------------- ------- मोबाईल क्रमांक------------------------------

राहणार-------------------------------------------- याद्वारे घोषित करते की, मी स्वंय घोषणापत्रासोबत सादर केलेली सर्व माहिती माझ्या व्यक्तीगत माहिती व समजुती नुसार खरी आहे. सदर माहिती खोटी आढळून आल्यास, भारतीय दंडसंहिता अन्वये आणि/किंवा संबधित कायदयानुसार मी कारवाईस पात्र राहीन याची मला पूर्ण जाणीव आहे.

अर्जदाराची स्वाक्षरी

अर्जदाराचे नांव-----------------

ठिकाण-

दिनांक-

**अर्जदाराचा**
**फोटो**

# विधवा प्रमाणपत्र

मी श्रीमती ---------------------------------------------------------वय ----- वर्ष
आधारक्रमांक------------------------------------- मोबाईल क्रमांक----------------------------

राहणार------------------------------------------- याद्वारे घोषित करते की, माझे पती ------------------------------------ हे मयत आहेत. व मी पुर्नविवाह केलेला नाही.

मी स्वंय घोषणापत्रासोबत सादर केलेली सर्व माहिती माझ्या व्यक्तीगत माहिती व समजुती नुसार खरी आहे. सदर माहिती खोटी आढळून आल्यास, भारतीय दंडसंहिता अन्वये आणि/किंवा संबधित कायदयानुसार मी कारवाईस पात्र राहीन याची मला पूर्ण जाणीव आहे.

अर्जदारची स्वाक्षरी -

अर्जदाराचे नांव----------------

ठिकाण-

दिनांक-

## अर्जासोबत जोडावयाची साक्षाकिंत केलेली कागदपत्रे

१) उमेदवारांने विवाहपूर्वीचे नांव व विवाहनंतरचे नांव या दोन्ही नावांची व्यक्ती एकच असल्याचे राजपत्र (गॅझेट) किंवा विवाह निबंधकाचे विवाह नोंदणी प्रमाणपत्र यांची साक्षांकित प्रत किंवा स्टॅम्पपेपरवरील प्रतिज्ञापत्र

२) जन्म तारखेचा पुरावा म्हणून शाळा सोडलेचा दाखला किंवा १० वी चे प्रमाणपत्र यांची साक्षांकित प्रत

३) उमेदवार अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती / इतर मागास प्रवर्ग / विमुक्त जाती / भटक्या जमाती / अर्थिक दृष्ठया दुर्बल घटक / विशेष मागास प्रवर्ग/ सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासवर्ग या उमेदवाराने सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत सोबत जोडावी.

४) रेशनकार्ड, मतदान ओळखपत्र, आधारकार्ड, तलाठी रहिवाशी प्रमाणपत्र, Domicile certificate, तहसीलदार यांचे रहिवाशी प्रमाणपत्र यांचे साक्षांकित प्रत (परंतु वास्तव्याबाबत काही तक्रार झाल्यास किंवा संदिग्धता निर्माण झाल्यास तहसीलदार यांचे रहिवाशी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.)

**५)** उमेदवार संबधित नगरपरिषद/नगरपंचायत क्षेत्रातील रहिवाशी असलेबाबतचे स्वंयघोषणापत्र

**६)** लहान कुंटूबाचे प्रमाणपत्र

**७)** उमेदवार विधवा असल्यास स्वंयघोषणापत्र व पतीच्या मृत्यूचे प्रमाणपत्र साक्षांकित प्रत

**८)** उमेदवार अनाथ असल्यास सक्षम प्राधिकाऱ्याच्या प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत

**९)** इयत्ता १२ वी उत्तीर्ण, पदवीधर, पदव्युत्तर, डी.एड, बी. एड, MS-CIT / संगणक समकक्ष परीक्षा उत्तीर्ण झालेचे गुणपत्रक व प्रमाणपत्र यांच्या साक्षांकित प्रती

१०) अंगणवाडी सेविका/मदतनीस/ मिनी अंगणवाडी सेविका म्हणून कमीतकमी २ वर्षाचा अनुभव असल्यास सक्षम प्राधिकाऱ्यांच्या(बाल विकास प्रकल्प अधिकारी) अनुभव प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत

महिला व बाल विकास, शासन निर्णय क्र. एबावि२०२२/प्र.क्र.९४/ का. ६, दि. ३० जानेवारी, २०२५

## सोबतचे परिशिष्ट

| बाब | एकूण गुण | अंगणवाडी सेविका व अंगणवाडी मदतनीस (किमान अर्हता १२ वी उत्तीर्ण) | |
|---|---|---|---|
| शैक्षणिक अर्हता | ८० गुणापर्यत | शैक्षणिक अर्हता | दयावयाचे गुण |
| | | १) बारावी | |
| | | ८०% पेक्षा जास्त | ६० |
| | | ७०.०१% ते ८०% | ५५ |
| | | ६०.०१ % ते ७०% | ५० |
| | | ५०.०१% ते ६०% | ४५ |
| | | ५०% ते ४० % | ४० |
| | | टिप:- ज्या उत्तीर्ण उमेदवारांना ४० % पेक्षा कमी गुण असतील त्यांना सरासरी ३५ गुण ग्राहय धरण्यात येतील. | |
| | | २) पदवीधर | १० |
| | | ३) पदव्युत्तर | ४ |
| | | ४)डी.एड | २ |
| | | ५)बी.एड | २ |
| | | ६) शासकीय मान्यता संस्थेचे संगणक परिक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र (MS-CIT) अथवा शासनाने वेळोवेळी समकक्ष ठरविलेला संगणक अभ्यासक्रम पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र असल्यास | २ |
| अतिरिक्त गुण | २० गुणापर्यत | | |
| विधवा/अनाथ | | | १० |
| अनुसुचित जाती/अनुसुचित जमाती | | | ०५ |
| इतर मागास प्रवर्ग / विमुक्त जाती / भटक्या जमाती/ आर्थिक दृष्टया दुर्बल घटक / विशेष मागास प्रवर्ग/सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासवर्ग | | | ०३ |
| अंगणवाडी सेविका/मदतनीस/ मिनी अंगणवाडी सेविका म्हणून कमीतकमी २ वर्षाचा अनुभव असल्यास | | | ०५ |